N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** बिडकीन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0234 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**07/04/2026 00:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिंनाक पासून):** 06/04/2026
   **Date To ( दिंनाक पर्यत):** 06/04/2026
   **Time From (वेळेपासून):** 13:55 बजे
   **Time To (वेळेपर्यत):** 13:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 06/04/2026 **Time (वेळ):** 23:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 06/04/2026 23:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्राथमिक आरोग्य केंद्र बिडकीन,पैठण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): योगेश भास्कर शिंदे पोलिस निरिक्षक लाप्रवि छ.संभाजीनगर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 31/05/1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलिस निरिक्षक ,ला प्र वि छ संभाजीनगर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण), महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलिस निरिक्षक ,ला प्र वि छ संभाजीनगर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण), महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9403865681

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | डॉ. विजय बजरंग दळवी | | | 1. ए-3 व्हिनस सोसायटी, बिड बायपास,छ संभाजीनगर, बिडकीन,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 2 | 2 नारायण हरिश्चंद्र ब्राम्हणे | | | 1. बीडकीन नवीन गावठाण, कष्णापुर ,पैठण,बिडकीन, छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण), महाराष्ट्र,भारत |



Scanned with OKEN Scanner

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | अँथ्रासिन पावडर लावलेली लाचरक्कम 1200 रुपये फक्त | 1,200.00 |

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

1,200.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिंयाद दि. 06/04/2026

मी योगेश भास्कर शिंदे वय 36 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो नं. 9403865681
मी दिंनाक 06/04/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात हजर असताना, मला मा. पोलीस उप अधिक्षक, श्री तळेकर यांनी त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन समक्ष हजर असलेले तक्रारदार संतोष भाऊसाहेब गवारे, वय-36 वर्षे रा. बीडकीन, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांची ओळख करुन देवुन, त्यांची लाचे संदर्भात तक्रार असल्याचे सांगुन त्यांचे तक्रारीवर कारवाई करणेसाठी पंच उपलब्ध करुन घेवुन पुढील कारवाई करणेबाबत आम्हास तोंडी आदेश दिला. त्यावेळी आम्ही सदर तक्रारदार यांना तक्रारीबाबत प्राथमिक माहीती विचारुन त्यानंतर दोन शासकिय पंच उपलब्ध करुन त्यांचेसमक्ष तक्रारदाराकडे विचारपुस करुन तक्रारदाराने सांगीतलेली तक्रार लेखी लिहुन घेतली ती पुढीलप्रमाणे
मी संतोष भाऊसाहेब गवारे वय 36 वर्षे व्यावसाय चालक रा. बिडकीन ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर, मी वरीलप्रमाणे असुन माझेकडे स्वत:ची रिक्षा असुन ती चालवुन मी कुटूंबाची उपजिवीका भागवतो. माझी बहीण सिमा चंदु दुबीले हिचे लग्न झाले असुन तीला दोन मुले आहेत. तीचे कुटूंब नियोजनाचे ऑपरेशन करायचे असल्याने मी बीडकीन प्रा.आ. केंद्र येथील डॉ. विजय दळवी यांचकडे मी ऑपरेशनबाबत चौकशी केली. त्यावेळी त्यांनी मला 6,000/- रुपये लागतील असे सांगीतले. त्यानंतर मी चौकशी केली असता शासकिय रुग्णालयात कुटूंब नियोजनाचे ऑपरेशन करायचे असल्यास कोणतीही शासकिय फी लागत नाही. त्यामुळे डॉ दळवी यांनी केलेल्या पैशाची मागणी ही लाच आहे याची खात्री झाली आहे. मी काल दि. 05/04/2026 रोजी माझी बहीण सिमा दुबीले हीला बीडकीन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रात्री 08.00 वाजता अॅडमिट केले आहे. तीचे आज कुटूंब नियोजनाचे ऑपरेशन डॉ. दळवी हे करणार आहे. तरी ते आज ऑपरेशनपुर्वी किंवा ऑपरेशन नंतर माझ्याकडे पैशाची मागणी करतील. त्यांनी किंवा त्यांचेवतीने आणखी कोणी माझ्याकडे ऑपरेशन साठी शासकिय फी व्यतीरीक्त पैशाची मागणी केल्यास मला त्यांना देण्याची इच्छा नाही तरी देखील पैशाची मागणी केल्यास त्यांचेविरुध्द कारवाई करावी.
डॉ. दळवी प्रा.आ.केंद्र बीडकीन यांचेत व माझ्यामध्ये कोणताही वयक्तीक वाद अथवा भांडण नाही. तसेच त्यांचेत व माझ्यामध्ये कोणताही उसनवारी किंवा आर्थीक व्यवहार नाही. हा तक्रार अर्ज मला वाचुन दाखवला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे. वगैरे तोंडी तक्रार सांगीतली सदरची तक्रार पंचासमक्ष लिहुन घेवुन त्यानंतर पंचासमक्ष तक्रारदाराने, पंचांनी व आम्ही सहया केल्या.
त्यावरुन आम्ही तक्रारदार संतोष गवारे यांनी डॉ. दळवी यांचेविरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय? ते तक्रारदार यांचेकडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी दि. 06/04/2026 रोजी आम्ही सर्वानुमते लाचमागणी



Scanned with OKEN Scanner

पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईकामी लागणारे योग्य त्या सर्व साहीत्यासह खाजगी वाहनाने सुरक्षीत ठिकाणी जावुन तक्रारदार, दोन्ही पंच सापळा पथकास तशा सविस्तर सुचना दिल्या. तसेच माझे सुचनेवरुन पोअं. हिवाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये यापुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदाराचे गळ्यात अडकवुन दिला. त्यानंतर तक्रारदार संतोष गवारे यांना पंच क्रं. 1 बालराजु येंड्रा यांचेसोबत तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने डॉ. दळवी यांना भेटण्यासाठी प्रा.आ.केंद्र बीडकीन सरकारी दवाखाना येथे 12.40 वा. पाठवले. त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार व पंच क्रं. 1 हे सापळा पथक थांबलेल्या गोपनीय ठिकाणी 13.26 वाजता परत आले. तक्रारदाराचे गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर पोअं. हिवाळे यांनी काढुन बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण मी तक्रारदार व पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये डॉ. दळवी, शासकिय रुग्णालय बीडकीन यांनी पंच क्रं. 1 बालराजु येंड्रा यांचेसमक्ष तक्रारदार संतोष गवारे यांना म्हणाले की, तेवढं करुन टाका त्यावेळी तक्रारदार श्री. संतोष गवारे यांनी डॉ. दळवी यांना म्हणाले की, थोड फार कमी करानं, थोडे फार गरीब परिस्थिती आहे. असे म्हणाले त्यावर अभि. लोकसेवक डॉ. दळवी म्हणाले की, आता काय मी कमी करु ते तुम्हीच सांगा, ठिक आहे हो बाराशे देवुन टाका यांच्याकडे (हाताचा ईशारा करुन तेथे हजर असलेला सफाई कर्मचारी नारायण ब्राम्हणे यांचे कडे देवुन टाका) असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे त्यांचे बहीणीचे कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन करण्यासाठी कोणतीही शासकीय फीस लागत नसताना 1200/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचरक्कम त्यांचेच दवाखान्यातील समक्ष हजर असलेला कंपाऊंडर/साफसफाई कर्मचारी याचेकडे आणुन देवुन लाचरक्कम कंपाऊंडर करवी स्वत:साठी स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन आम्ही सर्वानुमते डॉ विजय दळवी व त्यांचे शासकिय दवाखान्यातील कंपाऊंडर यांचेविरुध्द लागलीच दि. 06/04/2026 रोजी प्रा.आ.केंद्र शासकिय दवाखाना बीडकीन मध्ये सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर माझ्या सुचनेवरुन पोह इंगळे यांनी अँथ्रासिन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन तक्रारदार व पंचांना त्याचे प्रात्याक्षीक दाखविले. डॉ. दळवी यांना लाच म्हणुन देण्यासाठी तक्रारदाराने हजर केलेली 500 रुपये दराच्या दोन नोटा व 200 रुपये दराची एक नोट यांचे वर्णन टंकलिखीत करुन सदर लाच रकमेकरीता वापरण्याचे नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरचे नोटा तक्रारदाराचे पॅण्टचे समोरील उजव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना पुन्हा सविस्तर सुचना देवुन शासकिय दवाखाना बीडकीन येथील डॉ दळवी यांनी सांगीतलेल्या कंपाऊंडरने लाचरक्कम स्विकारल्यास डॉ. दळवी यांना कॉल करण्यास सांगुन त्यानंतर लाचरक्कम स्विकारल्यानतर त्यांचे डाव्या खिशातील रुमाल बाहेर काढुन हातात धरण्याचा इशारा करणेबाबत तक्रारदार यांना सुचना दिली. तसेच सापळा पथकातील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन तशा सुचना दिल्या.

त्यानंतर पुन्हा माझे सुचनेवरुन पोअं. हिवाळे यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन रेकॉर्डर चालु करुन तक्रारदाराचे गळयात अडकवुन दिला. त्यानंतर तक्रारदाराचे मोटार सायकलवरुन तक्रारदार व पंच क्रं. 1 यांना शासकिय दवाखाना, बीडकीन येथील डॉ दळवी यांनी सांगीतलेल्या कंपाऊंडरकडे 13.42 वा. पाठविण्यात आले. त्यांचे पाठीमागे मी व पंच क्रं.2 यशराज सौंदे व सापळा पथक असे खाजगी वाहनाने ग्रामीण रुग्णालय, बीडकीन ता पैठण येथे गेलो. व एकमेकांना दिसतील अशारितीने शासकिय दवाखान्याचे परिसरात एकमेकांना दिसतील अशारितीने सापळा लावुन थांबलो.

त्यानंतर तक्रारदार संतोष गवारे व पंच क्रं. 1 असे ग्रामीण रुग्णालय बीडकीन येथील तक्रारदाराच्या बहीणीचे कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन करण्यासाठी डॉ दळवी यांनी 1200/- लाचमागणी करुन सदर लाचेची रक्कम त्यांचे दवाखान्यातील कंपाऊंडरकडे आणुन देण्यास सांगीतल्याने सदर कंपाऊंडरला भेटण्यासाठी ग्रामीण रुग्णालय बीडकीनचे आतमध्ये गेले. त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार संतोष गवारे यांनी दवाखान्याचे समोर येवुन ठरल्याप्रमाणे लाचरक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा 13.55 वा. केला. त्यानंतर सापळा पथक तात्काळ सक्रीय होवुन पंच क्रं. 2 यांचेसह त्या ठिकाणी आले. माझ्या सुचनेवरुन पोह/इंगळे यांनी तक्रारदाराचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला. त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं. 2 यांचे समक्ष पंच क्रं.1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्रं.1 याने सांगीतले की, मी व तक्रारदार असे अभि.कथित लोकसेवक श्री दळवी व त्यांचा कंपाउंडर यांची प्राथमीक आरोग्य केंद्र बिडकीण ता. पैठण येथे भेट घेण्यासाठी गेलो असता, कंपाऊंडर श्री. नारायण ब्राम्हणे यांची भेट झाली भेटी दरम्यान यांचेमध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर तक्रारदार यांनी श्री. नारायण ब्राम्हणे यास याची काही फिस वगैरे पावती गिवती राहत नाही का असे विचारले त्यावर श्री. नारायण ब्राम्हणे यांनी भुल तज्ञाची राहते कोणालाही विचारा असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार श्री. संतोष गवारे यांनी श्री. नारायण ब्राम्हणे यास तुझ्याकडे याची सरकारी नोंद नाही का असे विचारले असता श्री. नारायण ब्राम्हणे याने नाही म्हणुन पैसे माझ्याकडे जमा



Scanned with OKEN Scanner

करायचे असे म्हणुन बाराशे रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. श्री. नारायण ब्राम्हणे याने उजव्या हाताने लाचेची रक्कम 1200/- रुपये घेवुन त्याचे फिकट तपकीरी रंगाचे पॅण्टचे मागील उजव्या खिशात ठेवली आहे असे सांगीतल्याने कंपाउंडर यास लाचरकमेसह ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी ताब्यात घेतलेल्या इसमास माझी, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव नारायण हरिश्चंद्र ब्राम्हणे वय 37 वर्षे व्यावसाय कंत्राटी नोकरी, सफाई कर्मचारी ग्रामीण रुग्णालय बीडकीन ता पैठण रा. बीडकीन नवीन गावठाण, कृष्णापुर ता पैठण जि. छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले. त्यानंतर मी सदर सफाई कर्मचारी ब्राम्हणे यास लाचरक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली याबाबत विचारले असता त्याने सांगीतले की, तक्रारदारास त्याचे बहीणीचे ऑपरेशनसाठी रुपये 1200/- डॉ दळवी यांनी मागणी करुन सदर रक्कम माझ्याकडे देण्यास सांगीतली होती ती मी स्वत: उजव्या हाताने तक्रारदाराकडुन घेवुन पॅण्टचे मागील उजव्या खिशात ठेवली आहे असे सांगीतले. त्यानंतर पंच क्रं. 2 यांनी नारायण ब्राम्हणे यांचे पॅण्टचे मागील उजव्या खिशातुन लाचेची रक्कम रुपये 1200/- काढुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर नारायण ब्राम्हणे यांची अंगझडती घेतली असता त्यामध्ये एक ओप्पो कंपनीचा मोबाईल ताब्यात घेण्यात आला. त्यानंतर पोह इंगळे यांनी माझे सुचनेवरुन नारायण ब्राम्हणे यांचे हात, लाचेची रक्कम व पॅण्टवर अल्ट्राव्हायलेट बॅटरीचे सहाय्याने चेक केले असता नारायण ब्राम्हणे यांचे उजव्या हातावर , पॅण्टचे मागील उजव्या खिशावर व लाचेच्या रकमेवर ठिकठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर 1200/- रुपये पंचासमक्ष जागील लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आले. त्यानंतर तक्रारदाराचे हात, पॅण्ट व शर्ट पंचासमक्ष अल्ट्राव्हायलेट उजेडाचे प्रकाशात तपासले असता तक्रारदाराचे उजव्या हातावर व पॅण्टचे समोरील उजव्या खिशाच्या तोंडावर व आतमध्ये ठिकठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली.

ताब्यातील नारायण ब्राम्हणे यास डॉ. दळवी हे कोठे आहे याबाबत विचारले असता त्याने सांगीतले की, तक्रारदाराशी बोलुन डॉ दळवी हे लागलीच दवाखान्यातुन छत्रपती संभाजीनगरला निघुन गेले. असे सांगीतल्यावर आम्ही डॉ दळवी यांचे कक्षात पाहीले असता ते दिसुन आले नाही. त्यानंतर आम्ही नारायण ब्राम्हणे यास ताब्यात घेवुन सोबत पंच व सापळा पथक असे खाजगी वाहनाने प्रथम डॉ दळवी यांचे घरी जावुन चौकंशी केली असता ते मिळुन आले नाही त्यांनतर आम्ही डॉ दळवी हे सहयाद्री हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे असल्याचे समजल्यानंतर तेथे जावुन त्यांनादेखील ताब्यात घेतले. त्यावेळी त्यांना आमची ओळख देवुन त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव डॉ विजय बजरंग दळवी वय 58 वर्षे व्यावसाय नोकरी- वैदयकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय बीडकीन ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले. त्यानंतर त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे अंगझडतीमध्ये त्यांचे स्वत:चे चारचाकी कारची चावी व एक विवो कंपनीचा मोबाईल मिळुन आला तो पंचासमक्ष ताब्यात घेवुन डॉ दळवी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयात घेवुन आलो. तसा सविस्तर पंचनामा केला आहे.

(सीसीटीएनएस मध्ये शव्द मर्यादा असल्याने उर्वरीत फिंयाद जवाब सोबत जोडला आहे.)

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NILESH SHIVAJI SHELKE(SI (Sub-Inspector)) / 15101000402NSSM8801F **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): NILESH SHIVAJI SHEI
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): 15101000402NSSM880

HC1147
पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन बिडकीन
ता.पैठण, जि.औरंगाबाद (ग्रामीण)



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner

तरी दि. 06/04/2026 रोजी तक्रारदार संतोष गवारे याची बहीण सिमा दुबीले हीचे कुटुंबनियोजनाचे ऑपरेशन हे शासकिय योजनेतुन मोफत असतानादेखील तक्रारदाराकडुन त्याचे बहीणीचे ऑपरेशन करण्याचा मोबदला म्हणुन ग्रामीण रुग्णालय बीडकीन ता पैठण येथील वैदयकीय अधिक्षक डॉ. विजय दळवी यांनी तक्रारदाराकडे 1200/- रुपये स्वत:साठी लाचमागणी करुन सदर लाचेची रक्कम त्यांचे शासकिय दवाखान्यातील सफाई कामगार नारायण ब्राम्हणे याचेकडे आणुन देण्यास सांगीतली. त्यावरुन डॉ दळवी यांचे सांगण्यावरुन सदर लाचेची रक्कम ग्रामीण रुग्णालय बिडकीनचा सफाई कामगार नारायण ब्राम्हणे याने स्विकारली त्यानंतर त्यास ताब्यात घेण्यात आले आहे. म्हणुन माझी डॉ. विजय दळवी, वैदयकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय बीडकीन व नारायण ब्राम्हणे , सफाई कर्मचारी, ग्रामीण रुग्णालय बीडकीन यांचेविरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. सन 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

मी दिलेली फिर्याद माझे सांगण्याप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन त्याची प्रिंट काढुन मी वाचुन पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन बिडकीन
ता.पैठण, जि.औरंगाबाद (ग्रामीण)

PI ACB CSN

Scanned with OKEN Scanner